# भ्रष्टाचार कसा रोखता येईल?

**प्रवीण दीक्षित**

## I) प्रस्तावना

भारतातील भ्रष्टाचार हा पूर्वीपासून आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले. महायुध्द संपले तरी त्याचा परिणाम भ्रष्टाचार वाढीवर होत राहिला. महायुध्दाच्या काळात जे करार झाले ते रद्द करण्यासाठी भ्रष्टाचार झाला. सरकारकडे शिल्लक असलेली यंत्रसामुग्री व इतर साठा याची विल्हेवाट लावत असताना भ्रष्टाचार वाढला. सदरचा भ्रष्टाचार नियंत्रणात आणण्यासाठी त्या काळात कायदे, नियम पाहिजे तेवढे अंमलात आलेले नव्हते. भ्रष्टाचार रोखण्यासाठी नियंत्रण नसल्यामुळे सरकारी खजिन्याचा दुरुपयोग झाला. सन १९४० पासून स्वातंत्र्य मिळेपर्यंत भ्रष्टाचारात सतत वाढ होत गेली.

त्यामुळे क्रिमिनल लॉ अ‍ॅमेंडमेंट ऑर्डिनन्स १९४४ (फौजदारी कायदा दुरुस्ती वटहुकूम १९४४) दिनांक २३/०८/१९४४ पासून अंमलात आला. त्याचे आयुष्य ६ महिन्यापुरते नव्हते. सदरचा वटहुकूम काढण्याचा मुळ उद्देश शासनाचा पैसा व मालमत्ता याचा बचाव करणे होता. म्हणजे ज्या सरकारी नोकराने सरकारी मालमत्ता, पैसा हा चोरला आहे, बेकायदेशीरपणाने ताब्यात ठेवला, फसवणुक अफरातफर करुन मिळविला आहे, तो पैसा व मिळकत जप्त करुन सरकार जमा करणे होता. सदरचा क्रिमिनल लॉ अ‍ॅमेंडमेंट ऑर्डिनन्स १९४४ आज देखिल अस्तित्वात असून रद्द झालेला नाही. त्याबाबत सुप्रिम कोर्टाने निर्णय दिलेले आहेत व तो मान्य केला आहे.

भ्रष्टाचार रोखण्यासाठी भादवि १८६०च्या कायद्यामध्ये देखील काही तरतूदी कलम १६१ ते १६५ मध्ये होत्या. परंतु सदरच्या तरतूदी कमी पडत होत्या. भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९४७ हा १२/०३/४७ रोजी अंमलात आला. त्यानंतर सदरच्या कायद्यामध्ये वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आल्या व त्यानंतर भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ हा दि. ०९/०९/१९८८ पासून भारतात (जम्मू काश्मिर वगळून) लागू झाला. जम्मू काश्मिर साठी वेगळा भ्रष्टाचाराचा कायदा आहे.

सन १९४७ चा भ्रष्टाचाराचा जो कायदा होता त्यामध्ये लोकसेवकाच्या व्याख्येची व्याप्ती मर्यादित होती. भादवि कलम २१ जी व्याख्या आहे ती लागू होती. त्यामुळे सदरच्या व्याख्येमध्ये अनेक व्यक्तींचा समावेश नव्हता. जसे नगरसेवक, सरपंच, जि.प. सदस्य वगैरे.

जेव्हा भ्रष्टाचार हा फक्त शासकीय नोकरच करीत नसून वर उल्लेखित लोकप्रतिनिधीही भ्रष्टाचार करतात परंतु त्याचे विरुध्द कायद्यातील त्रुटीमुळे कारवाई होऊ शकत नाही हे लक्षात आल्यानंतर शासनाने १९८८ चा कायदा केला व १९४७ च्या कायद्यामध्ये आमूलाग्र बदल केला.

अलिकडच्या काळात परिस्थिती आणखी बिकट होत चालली आहे. शासकीय नोकरापेक्षा जास्त प्रमाणात खाजगी लोक वेगवेगळया माध्यमातून भ्रष्टाचार करीत आहेत. व्यापारी वर्गात, वेगवेगळया खाजगी संस्थेमध्ये, शाळा कॉलेज, हॉस्पिटल मध्ये भ्रष्टाचार चालू आहे. अशा कमर्शीअल ऑरगनायझेशनला देखिल भ्रष्टाचाराच्या कायद्यामध्ये सामील करण्यासाठी भारताच्या लॉ कमिशन यांनी फेब्रुवारी २०१५ मध्ये शिफारस केली आहे. सदर शिफारशीनुसार कमर्शिअल ऑरगनायझेशनमध्ये जे भारतामध्ये किंवा भारताबाहेर व्यापार उद्योगधंदा करतात त्याचा देखिल समावेश आहे. व्यवसाय मध्ये ट्रेड, प्रोफेशन, चॅरिटेबल समाविष्ट आहे.

पूर्वी भ्रष्टाचार हा अल्प प्रमाणात होत असे तो देखिल ठराविक क्षेत्रात लोकांना समजणार नाही अशा प्रकारे होत असे. पूर्वी भ्रष्टाचार करणारे अगदी बोटावर मोजणारे होते. सध्या अधिकारी प्रामाणिक आहे अशी सांगण्याची वेळ आली आहे. तरी देखील भ्रष्टाचार करणाऱ्यास तो शिष्टाचार वाटत आहे.

वास्तविक पहाता भ्रष्टाचार हा प्रत्येक क्षेत्रातील विभाग प्रमुखांनी संपुष्टात आणला पाहिजे. ती जबाबदारी ॲन्टी करप्शन ब्यूरोची आहे असे म्हणून चालणार नाही.

## II) <u>भ्रष्टाचाराच्या यादीत भारताचा ८५ वा क्रमांक</u>

भारतातील भ्रष्टाचार हा भारताच्या अर्थव्यवस्थेवर सर्वात जास्त परिणाम करणारा घटक आहे. सन २००५ मध्ये ट्रान्स्परन्सी इंटरनॅशनल च्या अहवाला प्रमाणे ६२ टक्के लोकांना पहिल्यांदा शासकीय कार्यालयात त्यांचे काम करण्याकरीता लाच द्यावी लागली. सन २००८ मध्ये त्याचे प्रमाणे ४० टक्के होते.

सन २०१४ मध्ये ट्रान्स्परन्सी इंटरनॅशनल च्या अहवालानुसार १७५ देशांच्या यादीत भारताचा क्र. ८५ वा लागतो. शेजारील देशांशी तुलना करता भूतान ३० वा क्रमांक, बांग्लादेश १४५ वा क्रमांक, म्यानमार १५६ वा क्रमांक, चीन १०० वा, नेपाळ १२६ वा, व पाकीस्तान १२६ वा देश आहे. (संदर्भः— https://www.transparency.org/cpi2014/in_detail )

भारतातील भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे स्त्रोत हया शासनामार्फत राबविल्या जाणा—या कल्याणकारी योजना आहेत. भ्रष्टाचाराचा अन्य स्त्रोत हा आंतरराज्य महामार्गावर वाहतूक उदयोगांना कोटयावधी रुपये लाच स्वरुपात भरावयास लावले जातात.

नुकतेच भारतीय मिडीयाने भारतीय लोकांनी कोटयावधी रुपयांचे काळे धन स्विस बॅकेत जमा करुन ठेवले असल्याचे प्रकाशित केले आहे.

भारतात भ्रष्टाचार होण्याची काही कारणेः— खूप मोठया प्रमाणावर नियम, क्लिष्ट कर, किचकट प्रक्रिया, परवाना प्रणाली, अपारदर्शक नोकरशाही, काही वस्तु व सेवा वितरणाची मक्तेदारी, कायदयाची अयोग्य अंमलबजावणी आणि प्रक्रिया; तसेच लोकांमध्ये भ्रष्टाचाराविरूध्द असलेली उदासीनता व भ्रष्टाचाराने स्वतःचे काम करून घेण्याची प्रवृत्ती.

शासन स्तरावर कार्यरत असलेल्या वर्ग १, वर्ग २, वर्ग ३ तसेच वर्ग ४ येवढेच नाही तर लोकप्रतिनिधी अशा सर्व स्तरावरील लोकसेवकांना भ्रष्टाचाराने विळख्यात घेतले आहे. गरजेपेक्षा जास्त पैसे उपलब्ध असूनही केवळ पैसा कमविण्याचा हव्यास भ्रष्टाचार जन्मास घालतो.

**क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा भारतात ३ रा क्रमांक लागतो व लोकसंख्येच्या दृष्टीने उत्तरप्रदेश नंतर दुस—या क्रमांकाचे राज्य महाराष्ट्र आहे. सन २००६—०७ ची टक्केवारी पाहता महाराष्ट्र हे भारतातील श्रीमंत राज्य असून देशाच्या औद्योगिक उत्पादनात महाराष्टाचा १५ टक्के वाटा आहे तर एकुण देशांतर्गत उत्पादनात १३.३ टक्के इतका वाटा आहे. म्हणजेच भारताच्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचा नक्कीच भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठया प्रमाणावर वाईट परिणाम होत आहे.**

## III) नॅशनल काऊन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च सर्वे

नॅशनल काउन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च यांनी केलेल्या सर्वे मध्ये लखनऊ, भुवनेश्वर, चेन्नई, हैद्राबाद, पुणे तसेच ग्रामीण भागातील व्यक्ती हा जास्तीत जास्त लाच सर्वसाधारण कामाकरीता, प्रवेशाकरीता किंवा पोलीसांना देतो.

शहरी भागात नोकरी मिळविण्याकरीता आणि बदलीकरीता सरासरी रु १८,०००/— ची लाच तसेच ६०० रुपये ट्रॉफिक पोलीसांना दिली गेल्याचे सप्टेंबर २०१२ ते डिसेंबर २०१२ मध्ये केलेल्या सर्वेक्षणावरुन दिसून आले.

सर्वेक्षण मालिकेवरुन असे दिसून येते की नोकरशहा व राजकारणी यांच्याकडे काळा पैसा हा विकास योजना, खाण, तेल उत्पादन व विक्री, बॅकेकडून नॉन परफॉर्मिंग कर्ज, कॉन्ट्रॅक्टची गळती या माध्यमातून लाचेच्या स्वरुपातून जमा होतो.

उत्तरप्रदेश, बिहार, ओडीशा, तामिळनाडू, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्र येथील ३५९ ग्रामीण भागातील कुटुंबियांचे सर्वेक्षणातून असे निदर्शनास आले कि शासनाच्या कल्याणकारी योजनेत लाभ मिळवून देण्याकरीता अर्ध्या पेक्षा अधिक लाभार्थ्यांकडून लाचेची मागणी केली जाते.

निवृत्त सरकारी कर्मचारी यांची मुलाखत घेतल्यावर निदर्शनास आले की, सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुक हा राजकारणी व नोकरशहा यांचा अवैध पैसे मिळविण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. प्रत्येक प्रकल्पामागे त्याच्या एकुण खर्चाच्या २ ते १० टक्के इतके बेहिशेबी पैसे कमविले जातात व प्रकल्प लांबणीवर गेल्यास त्याचे प्रमाण २० टक्के पार करुन जाते.

आंध्रप्रदेश, बिहार, दिल्ली, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांसहीत एकुण १५ राज्यांतील खाजगी कॉन्ट्रेक्टर यांच्या सर्वेक्षणावरुन असे निदर्शनास आले की प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ९ टक्के इतकी रक्कम ही लाच म्हणून दिली जाते. ८० टक्के कॉन्ट्रेक्टर यांनी त्यांच्या मुलाखतीत त्यांचे काम पूर्ण करण्याकरीता लाच दिली असल्याचे

कबुल केले आहे. उत्पादन क्षेत्राची परिस्थितीही याच्याशी समांतर आहे. सर्वेक्षणाच्या अहवालानुसार ९१ टक्के व्यक्तींनी लाच दिल्याचे कबूल केले आहे.

रस्त्याच्या कडेला फेरीवाले म्हणून व्यवसाय करणारी व्यक्ती दर महिन्यास १,१०० रुपये लाच देत असल्याचे दिल्ली, नोयडा, लखनऊ, पटना आणि हैद्राबाद येथे केलेल्या सर्वेक्षणावरुन निदर्शनास आले आहे. अहवालानुसार एकुण उत्पन्नाच्या १३ टक्के लाच म्हणून दिले जाते.

विविध पक्षातील खासदारांनी देशातील काळा पैसा थांबविण्याकरीता सरकारला योजना राबविण्यास सांगितली त्यावरुन सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस पुरस्कृत एक अभ्यास करण्यात करण्यात आला. जोपर्यंत येथे निर्माण होणारा काळा पैसा एक तर परदेशात जमा होणे, रिअल इस्टेट, सोने किंवा दागिने या मार्गाने जमा होणे हे थांबत नाही तोपर्यंत काळा पैशाविरुध्द लढा देणे शक्य होणार नाही असे अभ्यासकांनी मत मांडले.

(संदर्भः— टाईम्स ऑफ इंडीया दि.२४ मे २०१५)

http://timesofindia.indiatimes.com/india/Govt-survey-pegs-bribe-at-Rs-4400/year-per-family/articleshow/47401712.cms

## IV) ACB महाराष्ट्र यांनी केलेल्या कारवाईत भ्रष्टाचार हा नियमन संस्था व विकासमय संस्थेत प्रामुख्याने चालल्याचे दिसते.

**(संदर्भः— www.acbmaharashtra.gov.in )**

**१) नियमन सस्थेतील भ्रष्टाचार (Regulating Authorities)**

| अ.क्र. | विभाग | सापळा कारवाई | |
|---|---|---|---|
| | | सन २०१४ | सन २०१५ (दि.०६/०६/२०१५ पर्यंत) |
| १ | महसूल | ३२८ | १२८ |
| २ | पोलीस | २९६ | १११ |
| ३ | विधी व न्याय | १३ | ७ |
| ४ | राज्य उत्पादन शुल्क | १० | ४ |
| ५ | राज्य परिवहन विभाग | ८ | ७ |
| ६ | प्रादेशिक परिवहन विभाग | १० | ३ |
| ७ | वन विभाग | १८ | १५ |
| ८ | आरोग्य विभाग | ४५ | १८ |
| ९ | विक्रिकर विभाग | ८ | ६ |
| १० | समाज कल्याण विभाग | १० | ५ |
| ११ | धर्मादाय आयुक्त | १ | १ |
| १२ | प्रदुषण नियंत्रण मंडळ | २ | — |
| १३ | वजन व मापे विभाग | ३ | — |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | क्रिडा विभाग | ३ | १ |
| १५ | वक्फ बोर्ड | १ | — |

२) विकासमय संस्थेतील भ्रष्टाचार **(Developmental Authorities)**

| अ.क्र. | विभाग | सापळा कारवाई | |
|---|---|---|---|
| | | सन २०१४ | सन २०१५ (दि.०६/०६/२०१५ पर्यंत) |
| १ | पाटबंधारे विभाग | १९ | ७ |
| २ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १४ | ७ |
| ३ | महानगर पालिका | ५७ | २५ |
| ४ | नगर पालिका | ३ | — |
| ५ | नगर परिषद | १३ | ६ |
| ६ | जिल्हा परिषद | ४९ | १९ |
| ७ | पंचायत समिती | १०३ | ५१ |
| ८ | नगर रचना विभाग | ४ | २ |
| ९ | वित्त विभाग | ७ | १ |
| १० | ग्राम विकास विभाग | १ | — |
| ११ | कृषी विभाग | १८ | ८ |
| १२ | सिडको | २ | — |
| १३ | म्हाडा | ५ | २ |
| १४ | म.रा.वि.वि. | ५५ | २६ |
| १५ | महिला व बाल विकास विभाग | ६ | ४ |
| १६ | महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ | ४ | — |
| १७ | शिक्षण विभाग | ५६ | १७ |
| १८ | सहकार व पणन विभाग | २० | ६ |
| १९ | उदयोग उर्जा व कामगार विभाग | ५ | ४ |
| २० | आदिवासी विकास विभाग | ७ | ४ |
| २१ | अन्न व नागरी पुरवठा | ९ | ६ |
| २२ | बंदर विभाग | २ | — |

## V) अेसीबी महाराष्ट्राच्या कारवाईचा थोडक्यात आढावा खालील प्रमाणे

| अ.क्र. | शीर्षक | २०१३ | २०१४ | दि. ०५/०६/२०१५ पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | सापळा | ५८३ | १२४५ | ५१३ |
| २ | अपसंपदा | १६ | ४८ | १८ |
| ३ | अन्य भ्रष्टाचार | ५ | २३ | ६ |

सन २०१४—१५ मध्ये ॲन्टी करप्शन ब्युरो, म.राज्य मार्फत केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ३९ कल्याणकारी योजनामध्ये एकुण ९८ पेक्षा जास्त सापळा कारवाई करण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या कल्याणकारी योजनेत लाभ मिळवून देतो असे सांगून किंवा विविध कल्याणकारी योजने अंतर्गत लाभार्थीना योजनेच्या लाभाचा धनादेश देण्याकरीता पैशांची मागणी केली जाते.

१) अंपग असल्याचा दाखला देण्याकरीता, अवैध व्यवसाय चालवत असल्याची धमकी देवून, एका ठिकाणावरुन दुसरीकडे बदली करण्याकरीता, मंजूर झालेले देयक मिळण्याकरीता, टेलिफोन बुथ किंवा स्टॉल मिळवून देण्याकरीता, पाल्यास शाळेत ॲडमिशन मिळवून देण्याकरीता तसेच अपंग व्यक्तींना व्यवसाय करण्याकरीता शासनामार्फत कर्ज दिले जाते. कर्ज मिळवून देण्याकरीता किंवा कर्जाऊ रक्कमेचा धनादेश, अपंग व्यक्तीस मिळवून देण्याकरीता लाचेची मागणी करुन अपंग व्यक्तीचे शोषण केले जाते. अेसीबी मार्फत सन २०१४ व २०१५ मध्ये आजपावेतो **एकुण १५** अपंग व्यक्तींच्या तक्रारीवरुन सापळा कारवाई करण्यात आलेली आहे.

२) बाळंतपणाच्या वेळेस वैद्यकीय उपचार मिळवून देण्याकरीता, नातेवाईकांना उपचार मिळवून देण्याकरीता, पत्नीच्या मृत्यूनंतर अनुकंपा तत्वावर पाल्यास भरती करण्याकरीता, नातेवाईकाचा मृत्यूचा दाखला मिळविण्याकरीता, तसेच बलात्कार पिडीत महिलेचे पुनर्वसन (मनोधैर्य योजना), आंतरजातीय विवाह योजना, महिलाबचत गट योजना, शालेय पोषक आहार योजना इ. विविध कल्याणकारी योजनेतून महिलांचे शोषण करुन त्यांच्याकडून पैशांची मागणी केली जाते. भ्रष्टाचाराने पिडीत महिलांच्या तक्रारीवरुन अेसीबीने सन २०१४—२०१५ मध्ये **५१ सापळा कारवाई** करण्यात आलेल्या आहेत.

३) जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळवून देण्याकरीता, राखीव जागेत शासकीय नोकरी मिळवून देण्याकरीता, पदोन्नती देण्याकरीता, शासकीय रुग्णालयात उपचार मिळण्याकरीता तसेच दलीत वस्ती सुधार योजना, गलिच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या पाल्यांना शिष्यवृत्ती योजन, अनुसुचित जाती व नवबौधांच्या वस्तीचा विकास योजना अशा विविध कल्याणकारी योजनेतून अनुसुचित जाती/ जमातीच्या लोकांचे शोषण केले जाते. अ.जाती/अ.जमातीच्या लोकांच्या तक्रारीवरुन अेसीबीने सन २०१४—२०१५ मध्ये **एकुण १६४ सापळा कारवाई** केलेल्या आहेत.

४) भूमी अभिलेखात नोंद घेण्याबाबत, दाखले देण्याकरीता, पेन्शन चालू करण्याकरीता, भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम मिळणेकरीता, वरीष्ठ नागरीकांकरीता असलेल्या शासनाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ मिळविण्याकरीता वृध्द नागरीकांकडून पैशाची मागणी केली जाते. भ्रष्टाचाराने पीडित वृध्द तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन अेसीबी मार्फत **एकुण ४१ सापळा कारवाई** करण्यात आलेल्या आहेत.

**अेसीबी मार्फत सन २०१४—२०१५ मध्ये एकुण ४० डॉक्टर, ११७ अभियंते, ४७ शिक्षक, १५ वकील, २३ सरपंच/उपसरपंच, ४ सभापती, १२ नगरसेवक, ६ नगराध्यक्ष, २१६ तलाठी व इतर १८६० लोकसेवकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. हया वरून स्पष्ट होते; उच्च शिक्षित अधिकारीही भ्रष्टाचारात पुढे आहेत.**

अेसीबी मार्फत सन २०१४—२०१५ मध्ये **एकुण १४२ वर्ग—१ (२ भारतीय वन सेवा अधिकारी), २६१ वर्ग—२, १४१० वर्ग—३, ८२ वर्ग — ४** शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सापळा कारवाई करण्यात आलेली असून त्या व्यतिरिक्त **१५१** इतर लोकसेवक व **२९४** खाजगी व्यक्तींवर देखिल कारवाई करण्यात आलेली आहे. कारवाई केलेल्यामध्ये **२३५३** पुरुष आरोपी व **१९२** महिला आरोपींचा समावेश आहे.

अेसीबी मार्फत महाराष्ट्र शासनाच्या एकुण **४०** पेक्षा जास्त विभागात कारवाई करण्यात आलेल्या आहेत हया वरून दिसते. शासनाच्या सर्व विभागात; सर्व दर्जाचे अधिकारी भ्रष्टाचारात पुढे आहेत.

## VI) अेसीबी मार्फत भ्रष्टाचारी व्यक्तींवर कारवाई करण्याकरीता खालील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

पूर्वी ग्रामीण भागातील लोकांचा अेसीबी कार्यालयाशी दुर्लभपणे संपर्क होत असे. पीडीत तक्रारदारास अेसीबी कार्यालयास सहज संपर्क साधता यावा याकरीता १०६४ या नि:शुल्क दुरध्वनीची सेवा संपूर्ण राज्यस्तरावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

वेबसाईट www.acbmaharashtra.gov.in, ईमेलआयडी acbwebmail@mahapolice.gov.in, मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net, फेसबुक www.facebook.com/MaharashtraACB, नि:शुल्क दुरध्वनी क्रमांक १०६४ अशा विविध प्रकारे ऑनलाईन व ऑफलाईन संपर्काकरीता शक्य ती सर्व साधने आता अेसीबी मार्फत उपलब्ध करुन दिलेली आहेत व त्याचा मोठया प्रमाणात लोक फायदा घेत आहेत.

अेसीबी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांमार्फत ग्रामीण तसेच शहरी भागात मोठया प्रमाणात जनजागृती उपक्रम राबवून तसेच गर्दीच्या ठिकाणी अेसीबी कार्यालयाची माहिती असलेले बॅनर लावून, पॅम्प्लेट वाटून अेसीबीच्या कारवाईबाबत व संपर्काबाबत माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराने पीडित ग्रामीण भागातील व्यक्तीचाही अेसीबी कार्यालयाशी सहज संपर्क होणे शक्य झाले आहे. तसेच प्रत्येक सरकारी कार्यालयाबाहेर अेसीबीचे अधिकारी पाळत ठेवून भ्रष्टाचाराने पीडित व्यक्तीच्या तक्रारीची दखल घेतात.

## VII) भ्रष्टाचार दूर करण्यासाठीच्या उपाययोजना

सर्व क्षेत्रामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. सर्व सार्वजनिक संस्था, धर्मादाय संस्था, शैक्षणिक संस्था, को–ऑपरेटिव्ह संस्था/सहकारी तत्वावरील संस्था मध्ये भ्रष्टाचार चालू आहे. वरील प्रकारच्या अनेक संस्थेमध्ये भ्रष्टाचाराबाबत आपण ऐकतो.

१) शैक्षणिक संस्थेमध्ये अगदी लहान मुलाच्या ॲडमिशनपासून ते मेडिकल, इंजनिअरिंग पर्यतच्या ॲडमिशसाठी डोनेशन द्यावे लागते. त्यासाठी ठोस पावले सरकारने उचलली पाहिजेत. संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन केली पाहिजे. संपूर्ण व्यवहार बॅकेच्या माध्यमातूनच होणे आवश्यक आहे. डोनेशनच्या सीट बंद केल्या पाहिजेत. डोनेशन घ्यावयाचे असेल तर बॅके मार्फतीने घेणे आवश्यक आहे.

२) हॉस्पीटल, सहकारी तत्वावरील साखर कारखाने, ट्रस्ट यांच्या नेमणूका कायम स्वरूपी नसाव्यात तसेच पुन्हा पुन्हा त्याच सदस्यांची नेमणुक होवू नये. प्रत्येक ठिकाणी शासकीय अधिकारी कमीत कमी दहा टक्के असणे आवश्यक आहे. जे स्वत:ला सामाजिक कार्यकर्ता समाज सुधारक, आर.टी.आय. ॲक्टीवीस्ट म्हणवून घेतात किंवा सरकारी साक्षीदार आहेत, सार्वजनिक काम करतात या सर्वाना लाच लुचपत प्रतिबंधक कायदा लागू केला पाहिजे, असे सर्व लोकांना लोकसेवक या व्याख्ये मध्ये आणणे आवश्यक आहे.

३) भ्रष्ट लोकसेवकाचे विरूध्द करवाई करणेसाठी ला.प्र.कायदा १९८८ चे कलम १९ प्रामणे सक्षम प्राधिकारी याची म्हणजे त्यास नोकरीवरून काढून टाकण्यास सक्षम आहे यांची मंजूरी घ्यावी लागते. अनेक केसेस मध्ये मंजूरी नाकारली जाते. वास्तविक पहाता जर एखाद्या लोकसेवकाने/शासकीय नोकराने अफरातफर किंवा कागदपत्रामध्ये बदल केला तर तो त्याचे नोकरीचा भाग नाही म्हणून त्याचेविरूध्द न्यायालयाने गुन्हयाची दखल घेणेसाठी क्रिमीनल प्रोसिजर कोड कलम १९७ प्रमाणे मंजूरीची आवश्यकता नाही असे सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय पूर्वी पासून आज तागायत आहेत. एखाद्या शासकीय नोकराने भ्रष्टाचार केला तर तो त्याच्या नोकरीच्या कर्तव्याचा भाग होऊ शकत नाही या धर्तीवर भ्रष्ट लोकसेवकाचे विरूध्द मंजुरीची आवश्यकता नाही अशी कायद्यामध्ये दुरूस्ती होणे अत्यंत आवश्यक आहे. थोडक्यात कलम १९ वगळले पाहिजे.

४) एखाद्या व्यक्ती विरूध्द लाच लुचपत प्रतिबंध कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल झालेला असेल त्यास रंगे हाथ पकडले असेल किंवा त्याची उघड चौकशी करून अपसंपदेचा गुन्हा दाखल झाला असेल तर मंजूरीची आवश्यकता नाही. अशा लोकसेवकाची जेवढी अपसंपदा निघते तेवढी अपसंपदा ही ताबडतोब जप्त होणे किंवा त्याची अपसंपदा निघालेली संपूर्ण मिळकत रिसिव्हरच्या ताब्यात एफ.आय.आर झाले दिनांकापासून सात दिवसाच्या आत देणे आवश्यक आहे. अशी कायद्यात दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

५) आरोपीस दंड झाल्यास भ्रष्टाचाराची तक्रार करणाऱ्यास सदरच्या दंडाच्या रक्कमेतून सहजा सहजी नुकसान भरपाई मिळावी. प्रत्येक गावांमध्ये भ्रष्टाचार मुक्ती योजना हे लोक आंदोलन होणे आवश्यक आहे.

६) अनेक लोकांकडे काळा पैसा आहे. अनेक लोकसेवक बेनामी मालमत्तेचे व्यवहार करतात वास्तविक पाहता बाजार भावापेक्षा कमी भाव सरकारने ठरवून दिलेला असतो, सदर सरकारी भावा प्रमाणे स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी कायद्याने भरणे आवश्यक असल्यामुळे ती भरली जाते परंतु सरकारी भावापेक्षा किती तरी कमी रकमेस मालमत्ता विकत घेतली जाते, सदर मालमत्तेमध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या जातात. अमाप काळा पैसा त्यामध्ये वापला जातो. उदा. जमीन सपाटीकरण, बंगले बांधणे वगैरे. सरकारी भावापेक्षा कमी किमंतीस जमीन/मिळकत तर घेतली जातेच ती देखील रोख रक्कमेने व इतराचे नाव जसे नातेवाईक, मित्र वगैरे. सदर व्यक्तीची जमीन/मिळकत विकत घेण्याची काहीही ऐपत नसते, त्यास कामधंदा नसतो, उत्पन्नाचे साधन नसते तरी देखील त्याचे बॅक खात्यामध्ये पैसे जमा केले जातात. असे भ्रष्ट व्यवहार बंद होणेसाठी कायद्यामध्ये दुरूस्ती होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व रजिस्ट्रेशनचे व्यवहार बॅकमार्फतच होणे आवश्यक आहे. सरकारी भावापेक्षा कमी रकमेस मिळकत घेतल्यास ती बेकायदशीर समजून सरकार जमा होईल व त्या व्यवहारामध्ये भाग घेणाऱ्यास सजा होईल असा कायदा होणे आवश्यक आहे.

## VIII) भ्रष्टाचाराच्या केसेस न्यायालयातून का सुटतात? त्यासाठी उपाययोजना.

**न्यायालयातून केसेस सुटण्याची मुख्य कारणे म्हणजे**

१) मंजुरी आदेशामध्ये दोष

जसे without application of mind मंजुरी दिली, सक्षम प्राधिकारी नाही वगैरे. त्याबाबत मंजुरी विना चार्जशीट दाखल करता येते अशी कायद्यामध्ये दुरूस्ती व्हावी.

२) फिर्यादी, पंच, साक्षीदार फितूर झाला.

त्यासाठी भ्रष्ट कायद्या खालील खटल्यामध्ये जो फितूर होईल त्यास कडक शासन व त्याची समरी केस चालविणेबद्दल कायद्यात दुरूस्ती, तसेच शासकीय पंचास नोकरीतून निलंबन अशी दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

३) भ्रष्टाचाराचे खटले चालविण्याच्या न्यायाधीशांची संख्या वाढविणे व त्यांना फक्त भ्रष्टाचाराचेच खटले चालविण्यास देणे म्हणजे जलद गतीने निकाल लागतील.

४) भ्रष्टाचाराचे खटले चालविणाऱ्या सरकारी वकीलांचे वेगळे cadre करण्यात यावे व त्याची नेमणूक करण्यासाठी समिती नेमणे व त्या समितीवर महासंचालक,ACB असणे आवश्यक आहे.

## समारोप

वरील उपाय योजनांबाबत सर्व राजकीय पक्ष व लोक प्रतिनिधी हयांनी एकत्र येऊन सहमतीने काम केल्यास भ्रष्टाचार रोखणे अवघड नाही; हे बोट्स्वाना देशाच्या उदाहरणाने स्पष्ट होते. १९८२ मध्ये सर्वात जास्त भ्रष्ट असणारा बोट्स्वाना देश; आज जवळजवळ पूर्ण भ्रष्टाचार मुक्त झाला आहे.

——०——०——०——